# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

प्रेसनोट क्रमांक २६१/२०२४ दिनांकः- १३/०७/२०२४.

## “ १७ वर्षापासून पाहिजे असणारा मिरारोड व नालासोपारा येथिल ज्वेलर्सवर रिव्हाल्वर व चॉपरचा धाक दाखवून दरोडा टाकणाऱ्या दोन गुन्हयातील आरोपीस अटक करण्यात मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेस यश”

फिर्यादी नामे मुकेश नामालाल जैन याचे शॉप नं.११, टोपाझ शॉपींग सेंटर, तुळींज रोड, नालासोपारा पुर्व येथे सरगम गोल्ड नांवाचे ज्वेलर्सचे दुकान होते. दिनांक २४.०२.२००८ रोजी १०.३० वाजता फिर्यादी हे आपले दुकानात बसले असतांना आरोपीतांना दागीने पहाण्याचा बहाणा करुन दुकानात प्रवेश करुन फिर्यादीस रिव्हाल्वर व चॉपरचा धाक दाखवून मारहाण करुन दुकानातील कॅबीनमध्ये फिर्यादीचे हातपाय बांधुन कोंडुन ठेवून दुकानातील ४०,१०,०००/- रुपये किमतीचे सोन्याचे दागीने, नोकीया कंपनीचा मोबाईल फोन जबरी दरोडा टाकुन चोरी करुन नेल्याने नालासोपारा पो.स्टे.गुनोक्र. ७५/२००८ भादविसक ३९५, ३९७, ३४२, ३४ आर्म ॲक्ट कलम ३, २५ प्रमाणे गुन्हा दाखल आहे.

सदर गुन्हयाच्या तपासात आरोपी नामे १)वसंत चांगदेव म्हात्रे २)सौ.बायणबाई रामराव वाघमारे ३)सौ.कुसुम दिलीप कोरडे ४)सौ. इंदुबाई दत्तराव लोंबणे ५)दिपक जगदीश रोडा यांना गुन्हा दाखल झाल्यानंतर अटक करुन त्यांचे विरुध्द मा.न्यायालयात दोषारोपपत्र सादर करण्यात आले होते परंतु पाहीजे आरोपी नामे जॉनी ऊर्फ जर्नादन वाघमारे रा. नांदेड हा गुन्हा दाखल झाले पासुन पोलीसांना मिळुन येत नव्हता.

मा. वरीष्ठ अधिकाऱ्यांनी गंभीर व संवेदनशील गुन्हयातील पाहीजे आरोपीचा शोध घेणेबाबत आदेश केले होते. वरील गुन्हा अतिशय गंभीर स्वरुपाचा असल्याने तसेच नमुद गुन्हयातील पाहीजे आरोपी नामे जॉनी ऊर्फ जर्नादन वाघमारे रा. नांदेड यांचा यापुर्वी सर्वोतोपरी शोध घेऊन देखील तो गेल्या १६ वर्षापासुन मिळुन येत नव्हता.

त्याअनुषंगाने मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेचे प्रभारी पोलीस निरीक्षक राहुल राख यांनी १)पोउपनिरी.हितेंद्र विचारे, २)पोहवा.राजाराम काळे ३)पोहवा.हनुमंत सुर्यवंशी ४)पोशि.अकिल सुतार ५)पोशि.साकेत माघाडे ६)पोशि.नितीन राठोड असे तपास पथक तयार केले. नमुद पथकाने सदर गुन्हयाची नालासोपारा पोलीस ठाणेतुन माहीती घेऊन त्यांनतर सलग ०१ महिन्यांपासुन अहोरात्र मेहनत घेवुन तपासात सातत्य ठेवून आरोपीची गोपनीय माहिती काढली असता पोशि. नितीन राठोड यांना पाहीजेत आरोपी जॉनी ऊर्फ जर्नादन वाघमारे हा नांदेड ऐवजी सध्या मु. भांडेगाव, ता.जि. हिंगोली येथे राहत असल्याची माहीती समजली. त्यावेळी पोलीस पथकाने हिंगोली या ठिकाणी जावून नमुद गावात सापळा लावला. आरोपीबाबत खात्री होताच स्थानिक पोलीसांचे मदतीने पाहीजेत आरोपी जॉनी ऊर्फ जर्नादन वाघमारे यास दिनांक १२.०७.२०२४ रोजी १३.०० वाजता शिताफिने ताब्यात घेण्यात आलेले आहे.

पाहीजे आरोपीकडे केलेल्या तपासात आरोपी हा सन २००७ मधील मिरारोड पोलीस ठाणे गुरनं ४७७/२००७ भादंवि कलम ३९५,३९७,३४२,३४ आर्म ॲक्ट कलम ३,२५ प्रमाणे या शस्त्रासह दरोडयाच्या गुन्हयात पाहिजे आरोपी असल्याचे आढळून आले असून त्याचे पुर्ण नांव जर्नादन ऊर्फ जॉनी रामराव वाघमारे, वय-४३ वर्षे रा.भांडेगाव, ता.जि. हिंगोली असे असल्याचे निष्पन्न झाले आहे. नमुद पाहीजे आरोपीस पुढील कारवाई करीता नालासोपारा पोलीस ठाणे यांचे ताब्यात दिले आहे.

अशा प्रकारे ज्वेलर्सच्या दुकानांवर सशस्त्र दरोडा टाकुन लाखो रुपयांचे सोन्याचे दागिने लुटणाऱ्या १७ वर्षापासून पाहीजे असणाऱ्या आरोपीस पकडण्यात मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेस यश आले आहे.

आरोपीवर यापुर्वी दाखल असलेले गुन्हे खालीलप्रमाणे ...

| अ.क्र. | पोलीस ठाणे | कलम |
|---|---|---|
| १) | हिंगोली ग्रामीण पोलीस ठाणे | गुनोक्र. २२/२००१ भादविसक ४५७,३८०,३११ |
| २) | भाग्यनगर पो.स्टे., नांदेड | गुनोक्र. २५७/२००१ भादविसक ३९५ वगैरे |
| ३) | हिंगोली ग्रामीण पोलीस ठाणे | गुनोक्र. १८/२००२ भादविसक ३२४,३२३,५०४,३४ प्रमाणे |
| ४) | भाग्यनगर पो.स्टे., नांदेड | गुनोक्र. १९९/२००२ भादविसक ४५७,३८० प्रमाणे |
| ५) | हिंगोली ग्रामीण पोलीस ठाणे | गुनोक्र. १९७/२००३ भादविसक ३९५ प्रमाणे |
| ६) | हिंगोली ग्रामीण पोलीस ठाणे | गुनोक्र. २३९/२००४ भादविसक ३९४ वगैरे |
| ७) | भाग्यनगर पो.स्टे., नांदेड | गुनोक्र. १९७/२००५ भादविसक ३९५ वगैरे |
| ८) | लिंबगांव पो.स्टे. हिंगोली | गुनोक्र.७६/२००५ भादविसक ३९४ वगैरे |
| ९) | हिंगोली ग्रामीण पोलीस ठाणे | गुनोक्र. १६१/२००६ भादविसक ३९५ वगैरे |
| १०) | हिंगोली ग्रामीण पोलीस ठाणे | गुनोक्र. ६९/२०११ भादविसक ३९५,४१२ प्रमाणे |
| ११) | सीटी कोतवाली पो.स्टे.अमरावती | गुनोक्र. ३२५/२०११ भादविसक ३९५,३९७,४९२,१२०(बी) प्रमाणे |
| १२) | चिखली पोलीस ठाणे, हिंगोली | गुनोक्र. ६९/२०१२ भादविसक ३९५,४१२ प्रमाणे |
| १३) | सेनगांव पोलीस ठाणे, हिंगोली | गुनोक्र.५६/२०१७ भादविसक ३९५,३९७,३०७,१०७,१२०(बी) प्रमाणे |

सदरची कारवाई ही पोलीस उप आयुक्त (गुन्हे) श्री. अविनाश अंबुरे, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री. मदन बल्लाळ यांचे मार्गदर्शनाखाली मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेचे प्रभारी पोलीस निरीक्षक/राहुल राख, सपोनि/नितीन बेन्द्रे, दत्तात्रय सरक, पोउपनिरी. हितेंन्द्र विचारे, सफौ/श्रीमंत जेधे तसेच पोहवा. राजाराम काळे, हनुमंत सुर्यवंशी, मनोहर तावरे, शिवाजी पाटील, गोविंद केद्रे, संतोष मदने आसीफ मुल्ला, राजविर संधु, प्रविणराज पवार, सतिष जगताप, महेश वेल्हे, संग्राम गायकवाड, अनिल नागरे, पोअंम/अखिल सुतार, नितीन राठोड, साकेत माघाडे, अंगद मुळे, मसुब सचीन चौधरी, सफौ/संतोष चव्हाण सर्व नेमणुक मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखा यांनी यशस्वी कामगिरी केली आहे.

